# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

दिनांक 22/07/2020 (बुधवार)
(दुपार)

---

### विनयभंग

पो.स्टे. केळवद :– दि. 16/07/2020 चे 08:00 वा. ते दि. 18/07/2020 चे 14:00 वा. चे सुमारास 28 वर्षीय पिडीत/फिर्यादी हि घरी हजर असता आरोपी नामे– राहुल उर्फ गोलु चगदरभान बोंदरे, वय 24 वर्ष, रा. केळवद याने तिच्या घरी प्रवेश करून तिच्या मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला. तसेच आरोपीने पीडितेला वारंवार फोन करून जवळीक साधण्याचे प्रयत्न केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. केळवद येथे आरोपीविरुध्द कलम 354, 354 (अ), 354(ड), 452 भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असून सदर गुन्हयाचा पुढील तपास मनापोशि अश्वीनी रंगारी 8180975125 या करीत आहे.

### पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

पो.स्टे. सावनेर – दिनांक 17/07/2020 चे 17.30 वा. चे सुमारास पो.स्टे. सावनेर हद्दीत फिर्यादी यांच्या 17 वर्षीय अल्पवयीन मुलगी हीला अज्ञात आरोपीने फिर्यादीच्या कायदेशीर रखवालीतून फुस लावून पळवून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम 363 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असून सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक फलेकर हे करीत आहे.

### अपघातात मृत्यु

पो.स्टे. बेला :– अंतर्गत 8 कि.मी. अंतरावरील सोनगाव लोधी येथे दिनांक 21/07/2020 चे 14:30 वा. ते 14:47 वा. दरम्यान एमपी–02/टीसी– 7889 क्रमांकाचा ट्रकचा चालक आरोपी नामे– विष्णुकुमार बालप्पा, वय 28 वर्ष, रा. लक्ष्मीपुरा ता. माधुगिरी जि. तुमकुर (कर्नाटका) याने त्याच्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन मोटरसायकला धडक दिली. या अपघातात मोटरसायकल चालक नामे– गौतम मुकिंदा मुन, वय 50 वर्ष, रा. उमरेड यांचा जागीच मृत्यू झाला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन बेला येथे आरोपी चालकाविरुध्द कलम 279, 304 (अ) भादंवी. सहकलम 184 मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीला अटक करण्यात आली आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक राहुल ठेंगणे 7972812569 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर